महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ७६ वे | दिनांक : ०९/०३/२०२६ | वार : सोमवार

## राज्यात इंधनाचा तुटवडा नाही : मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती



**मुंबई :** इराण विरुद्ध इस्त्रायल - अमेरिका युद्धामुळे राज्यात इंधन तुटवडा निर्माण झाल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरकसपणे फेटाळून लावला आहे. राज्यात कुठेही इंधनाचा तुटवडा नाही. माध्यमांनी काही शहरांत पेट्रोल-डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याचे वृत्त दिले. त्यामुळे पेट्रोल पंपांवर विनाकारण मोठ्या रांगा लागल्या. प्रत्यक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सरकार भविष्यातील स्थितीचा सामना करण्यास सक्षम आहे, असे ते म्हणालेत.

आखातातील इराण विरुद्ध इस्त्रायल - अमेरिका युद्धाचा फटका अवघ्या जगाला बसत आहे. त्याच्या झळा आता महाराष्ट्रातही पोहोचल्या आहेत. सरकारने घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात तब्बल 60 रुपयांची वाढ केली. तसेच त्याच्या वितरणावरही काही ठराविक दिवसांची कॅप लावली. विशेषतः तेल कंपन्यांनी पुण्यातील वितरकांना पैसे दिल्याशिवाय इंधन देण्यास नकार दिल्यामुळे राज्यात इंधन टंचाई निर्माण झाल्याचा दावा केला जात आहे. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना हा दावा जोरकसपणे फेटाळून लावला आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, लोकांना चुकीची माहिती देऊन पॅनिक तयार करण्याची गरज नाही. केंद्र सरकारने यासंदर्भातील आपली भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली आहे. भारताच्या ऊर्जा सुरक्षेसंबंधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कशाप्रकारे पाऊले उचलली हे आपल्यासमोर आले आहे. सध्या राज्यात कुठेही इंधन टंचाई नाही. काही माध्यमांनी दोन-तीन दिवस झाले पेट्रोल - डिझेलचा तुटवडा निर्माण होणार असल्याच्या बातम्या दिल्या. यामुळे पेट्रोल पंपांवर विनाकारण मोठमोठ्या रांगा लागल्या. असा कोणताही तुटवडा नाही. केंद्र सरकारनेही हे स्पष्ट केले आहे. भविष्यात जी परिस्थिती उद्धवेल, त्याचा सामना करण्यासाठी भारत सरकार मोदींच्या नेतृत्वा सक्षमपणे भक्कम परिस्थितीत आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे इराण युद्धामुळे सध्या भारतात एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. सरकारने व्यावसायिक गॅसच्या दरात अचानक 150 ते 200 रुपयांची वाढ केली आहे. यामुळे हॉटेल व्यवसाय कसा चालवायचा? हा प्रश्न व्यावसायिकांपुढे उभा राहिला आहे. दुसरीकडे, घरगुती गॅसच्या दरातही एकरकमी 60 रुपयांची वाढ झाली आहे. यामुळे सर्वसामान्यांचेही बजेट कोलमडले आहे. त्यातच काही शहरांत गॅसचा पुरवठा कोलमडल्यामुळे स्थिती बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी पुण्यातील महिलांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. देशात गॅसचे दर वाढत आहेत. तेलाचे दर वाढत आहेत. किराणा व इतर जीवनावश्यक वस्तूंचेही दर वाढले आहेत. पण आमचे पगार काही वाढत नाहीत. गॅस एजन्सीकडे गेल्यानंतर अनेक वेळा वेळेवर गॅस मिळत नाही, अशी ओरड या महिलांनी केली आहे.

## पुणे विद्यापीठ चौक उड्डाणपुलाचे लोकार्पण; अजित पवारांच्या नावाची मागणी







**पुणे :** पुणेकरांची वाहतूक कोंडीतून मुक्तता करणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील बहुप्रतिक्षित दुमजली उड्डाणपुलाचे लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे संपन्न झाले. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात मुरलीधर मोहोळ यांनी या पुलाला 'अजित पवार' यांचे नाव देण्याची आग्रही मागणी केली, ज्याला मुख्यमंत्र्यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत संमती दर्शवली आहे.

मुरलीधर मोहोळ यांच्या मागणीला पाठिंबा देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जुना पूल पाडून नवीन भव्य पूल उभारण्याचा धाडसी निर्णय अजित दादांनीच घेतला होता. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांनी सर्वांना विश्वासात घेऊन काम केले. हा पूल अभियांत्रिकी कौशल्याचा एक उत्तम नमुना आहे. अजित दादांनी पुण्याच्या विकासासाठी, विशेषतः रिंग रोड आणि भुयारी मार्गांचे जाळे निर्माण करण्यासाठी सातत्याने भूमिका घेतली आहे. त्यामुळे या पुलाला त्यांचे नाव देण्यास माझे पूर्ण समर्थन असून, आम्ही निश्चितपणे हे नाव देऊ.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आपल्या भाषणात अजित पवारांच्या कार्यपद्धतीचा गौरव केला. ते म्हणाले, गेल्या 8-10 वर्षांत पुण्यातील प्रत्येक मोठ्या विकासकामात अजित दादांचा सहभाग राहिला आहे. 2020 मध्ये जेव्हा या प्रकल्पाची सुरुवात झाली, तेव्हा मी महापौर होतो आणि दादा पालकमंत्री होते. त्यांनी कधीही विकासाच्या कामात राजकारण केले नाही. हा प्रकल्प त्यांच्याच संकल्पनेतून आणि दूरदृष्टीतून साकारला आहे. आज या आनंदाच्या क्षणी ते उपस्थित असायला हवे होते. त्यांच्या योगदानाची दखल घेऊनच या पुलाला त्यांचे नाव देण्याची पुणेकरांची इच्छा आहे.

## जूनपासून मुलींना शाळेतच मिळणार स्वसंरक्षणाचे धडे - मंत्री पाटील यांची घोषणा



**सांगली :** येत्या जून महिन्यापासून मुलींना शाळेतच स्वसंरक्षणाचे धडे मिळणार असल्याची घोषणा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी केली. यावेळी त्यांनी कमवा व शिका योजनेतून विद्यार्थ्यांना दरमहा २ हजार मानधन देण्याचीही घोषणा केली. त्यांच्या या घोषणेचा राज्यभरातील विद्यार्थ्यांना लाभ होण्याची शक्यता आहे.

जागतिक महिला दिनानिमित्त सांगलीत आज कन्या सबलीकरण उपक्रमांतर्गत मोफत सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. या उपक्रमांतर्गत कराटे प्रशिक्षण घेतलेल्या जवळपास १ हजार मुलींना मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते यलो बेल्ट ग्रेड प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी बोलताना मंत्री पाटील म्हणाले, महिला सबलीकरणासाठी केवळ महिलांनीच नव्हे तर सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत सांगली जिल्ह्यात महिला सबलीकरणासाठी आम्ही एक नवा प्रयोग केला. त्यात ५० शाळांमधील ३६ हजार मुलींना दर आठवड्याला शनिवारी १ तास कराटे व ज्युडोचे प्रशिक्षण दिले. त्यातील १५ हजार ४०० मुलींना आज आम्ही पहिला यलो बेल्ट दिला. त्या पुढचे बेल्ट मिळवण्यासाठी जे शुल्क द्यावे लागेल ते प्रशासन देईल.

येत्या जून महिन्यापासून प्रत्येक शाळेत मुलींना स्वसंरक्षणासाठी लाठ्याकाठ्याचे प्रशिक्षण मिळेल. सद्यस्थितीत राज्यातील विविध महाविद्यालयांत शिकणाऱ्या ५ लाख मुलींना सध्या कॉलेज फी लागत नाही. वसतिगृह शुल्क लागत नाही. याशिवाय त्यांना कमवा व शिका योजनेंतर्गत दरमहा २ हजार रुपयांचे मानधनही देण्यात येईल, असे ते म्हणाले. यावळी खासदार विशाल पाटील यांच्यासह आमदार इद्रिस नायकवडी, जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांच्यासह इतर अधिकारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

खासदार विशाल पाटील यांनी यावेळी मुलींचे मोफत सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण पाहून आपल्याला समाधान वाटत असल्याची भावना व्यक्त केली. मला दोन मुली आहेत. मुलींचे हे कराटे प्रशिक्षण पाहून माझे म्हातारपण सुखरूप जाईल असा विश्वास वाटतो, असे ते म्हणाले. त्यांचे हे विधान ऐकूण उपस्थितांत एकच हशा पिकला.

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०९ मार्च २०२६


# अभिमानाचा सोहळा यशस्वीरीत्या पार पडला



**छत्रपती संभाजीनगर :** येथील सामाजिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्रीमती सरला शामराव कामे – कुमावत यांना त्यांच्या उत्कृष्ट सामाजिक योगदानाबद्दल "समाजभूषण कर्तुत्ववान महिला पुरस्कार" प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा गौरव सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात व मोठ्या मान्यवरांच्या उपस्थितीत नुकताच पार पडला. समाजातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी, शिक्षण व जनजागृतीसाठी आणि विविध सामाजिक उपक्रमांद्वारे सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी श्रीमती सरला कामे यांनी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना आत्मविश्वास मिळाला असून समाजात सकारात्मक विचारांची प्रेरणा निर्माण झाली आहे. या गौरव सोहळ्यास "चला हवा येऊ द्या" फेम डॉ. निलेशजी साबळे (प्रसिद्ध सिनेअभिनेते, दिग्दर्शक आणि सूत्रसंचालक) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण लाभले.तसेच या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्येमा. श्रीम. चित्राताई वाघ (आमदार, विधानपरिषद महाराष्ट्र राज्य तथा प्रदेशाध्यक्षा, महिला मोर्चा, भाजपा)मा. श्रीम. वर्षाताई प्रशांत ठाकूरमा. श्रीम. मोहिनीताई विक्रांत पाटीलमा. श्रीम. प्रियाताई मकदम (जिल्हाध्यक्ष, महिला मोर्चा रायगड)मा. श्रीम. प्रतिभाताई पाटील (उपमहापौर, पनवेल महानगरपालिका) मा. श्रीम. नीलमताई नितीन जाधवमा. श्रीम. अर्चनाताई परेश ठाकूरमा. श्रीम. चारुशीलाताई घाटे (सचिव, महिला मोर्चा रायगड)मा. श्रीम. राजश्रीताई वावेकर (अध्यक्ष, महिला मोर्चा पनवेल शहर)या सर्व मान्यवरांच्या हस्ते श्रीमती सरला कामे यांचा शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे मनापासून कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.हा सन्मान केवळ श्रीमती सरला कामे यांच्यासाठीच नव्हे तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठीही अभिमानाची बाब ठरली आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजातील अनेक महिलांना प्रेरणा मिळत असून भविष्यातही त्या समाजासाठी असेच प्रेरणादायी कार्य करत राहतील, अशी सर्वांची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.या उल्लेखनीय सन्मानाबद्दल श्रीमती सरला शामराव कामे . कुमावत यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

# निरगुडी बु ठाकरवाडी लघु प्रकल्पाच्या धरणात गॅस पाईप द्वारे अवैध पाणी उपसा सुरूच



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील निरगुडी बु ठाकरवाडी या लघु प्रकल्पाच्या धरणात गॅस पाईप द्वारे अवैध पाणी उपसा सुरू आहे निरगुडी बु ठाकरवाडी लघु प्रकल्पातून निरगुडी बु. पळसगाव, कौटगाव, पिंपरी, तिसगाव, बोहळी तांडा,ठाकरवाडी, भिलवाडी,चिंचोली या नऊ गावांना पाणीपुरवठा केला जातो. परंतु ठाकरवाडी,भिलवाडी, देवठाणवाडी या वाड्यांच्या परिसरातील लघुप्रकल्प असतांना सुद्धा या बंजारा, बौद्ध, ठाकर, भिल्ल समाजाला पाण्याचा दरवर्षी सामना करावा लागत असतो या वाड्यांना आजही जल जीवन मिशन योजना यासारख्या योजनांपासून वंचित ठेवले आहे सध्या धरणामध्ये सुमारे 85 टक्के जलसाठा आहे परंतु या लघु प्रकल्पाची खोली कमी असल्यामुळे झपाट्याने पाणी उपसा होत असतो.या लघुप्रकल्पातील गाळ उपसा करणे गरजेचे आहे सध्या तिसगाव,बोहळी तांडा या परिसरातील शेतकरी दिवस रात्र गॅस पाईप लावून सिंचनासाठी शेतीसाठी अवैध पाणी उपसा करून डल्ला मारत आहे.त्यामुळे पुढील महिन्यापासून पाण्याची टंचाई निर्माण होणार असल्याने हा अवैध पाणी उपसा थांबविणे गरजेचे आहे.

# पंचमी महोत्सवाची उत्साहात सांगता



**फुलंब्री :** तालुक्यातील श्री. क्षेत्र चैतन्य गोरक्षनाथ महाराज खामगांव येथे धुलीवंदन पासून पाच दिवस पंचमी उत्सव मोठ्या पारपांरीक पद्धतीने साजरा करण्यात आला.पाच दिवसीय रंगपंचमी उत्साहात अनेक देवी-देवत यांची स्वारी, देखावे सादर करण्यात आले. यात गणपती, सरस्वती यांचे स्तवन करून उत्सवास सुरुवात झाली. यामध्ये भाबर्डी, विदूषक या पात्राद्वारे तसेच स्थानिक कलावंतानी मनोरंजनातून सामाजिक संदेश देणारे लोकगीत, नाटिका सादर केल्या. कुलस्वामिनी अंबादेवीची स्वारी गुरुवारी रात्री निघाली. आंबा भवानी की जय च्या गजराने देवीची स्वारी काढण्यात आली होती. देवीची स्वारी अभिजीत भाले यांनी घेतली. रोहिदास सोनवणे,शाईनाथ सोनवणे, सुनिल सोनवणे मानकरी होते. शुक्रवारी रात्री नृसिंह महाराज अवतार सादर करण्यात आला. नृसिंह महाराज स्वारी राहुल वैष्णव यांनी घेतले, कृष्णा सोनवणे, आण्णा सोनवणे, लक्ष्मण बखळे हे मानकरी होते.तर घोडे स्वारी बाबासाहेब सोनवणे, टंट्या भिलाची स्वारी गोरख सोनवणे, महादेवाचे सोंग मधु गिरी, मच्छिंद्रनाथचेपात्र सोमिनाथ करपे, गोरक्षनाथाचे पात्र आदेश सोनवणे यांनी घेतले सरस्वती ची भुमिका कचरु सोनवणे यांनी साकारली. हनुमानाची भुमिका घेतली सागर वैष्णव यांनी पार पाडली.पाच दिवस चालणाऱ्या कार्यक्रमात सामाजिक प्रबोधन, दारूबंदी, स्त्री भ्रुण हत्या, हुंडा बंदीसह, सामाजिक ऐक्याची संदेश देणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजनकरण्यात आले होते. पाडुरंग राकडे ,मंजितराव राकडे, आण्णा चव्हाण,हरिदास सोनवणे, संतोष काळे,दत्तु चव्हाण,सागर सोनवणे विजय राऊत , रघुनाथ सोनवणे ,आजिनाथ सोनवणे या कलाकारांनी आपली कला सादर केली.दिलीप सोनवणे, गणेश सोनवणे यांनी देवीची पदे गायली. पाच दिवसीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोकराव भाले यांनी केले. यावेळी पंचक्रोशीसह जिल्हाभरातून भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या सोहळ्यासाठी खामगांव ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०९ मार्च २०२६


# शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे विज्ञान मंडळ कार्यक्रम उत्साहात संपन्न




**कन्नड :** शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे विज्ञान मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला सायन्स क्लब कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. डी. शिरसाठ हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले होते.यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. एम. डी. शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विज्ञान क्षेत्रातील संधी, संशोधनाची गरज आणि विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात सातत्याने परिश्रम घेण्याचे महत्त्व याविषयी सविस्तर आणि प्रेरणादायी व्याख्यान दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी उपयुक्त असे मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रभावी आणि अभ्यासपूर्ण व्याख्यानामुळे उपस्थित विद्यार्थ्यांना नवीन दृष्टीकोन मिळाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले यांनी विद्यार्थ्यांनी विज्ञानाकडे केवळ विषय म्हणून न पाहता वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक असल्याचे सांगितले. आजच्या स्पर्धात्मक युगात जिज्ञासा, संशोधनाची वृत्ती आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर विद्यार्थी उज्ज्वल भविष्य घडवू शकतात, असे त्यांनी नमूद केले. तसेच अशा शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना मिळते, असेही त्यांनी आपल्या समारोपपर भाषणात सांगितले.या प्रसंगी रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र विषयच्या परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान मंडळाचे समन्वयक डॉ. डी. डब्ल्यू. शिंदे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. एस. बी. कोल्हे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुष्का सौंदणकर हिने केले तर आभारप्रदर्शन डॉ. ए. आर. मेहेत्रे यांनी केले. या कार्यक्रमास डॉ बी के.मगर,डॉ एस.एम.पवार,डॉ बी.के. मगरे,डॉ पी के संघई,डॉ वाय. एच .शेख,डॉ डी टी साखरे व महाविद्यालयातील प्राध्यापक सहकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# बेटी

बेटी दुनियां में आने से पहले
कहते हैं...
"बेटी बचाओं, बेटी पढ़ाओं "
दुनियां में आने के बाद वही
कहते हैं
"बेटी हमारी इज़्ज़त बचाओं
बेटी हमारी नाक मत कटाओं"

ध्यान से सुनों
तुम अपनी जुबान मत चलाओं
सब की इज़्ज़त करना सीखों
तुम औरत हो ...
इतना गुरूर तो मत दिखाओं

क्यों रीं....पढ़ लिखकर क्या
करेगी?
अरे..इसको कोई घर के काम
सिखाओं

दहेज में तोल दिया मुझें
क्या समझते हो...
बिकाऊं?

शादी के बाद भी इतना सोएगी
बेहूदा औरत...
अरे जाकर कोई उसको
जगाओं
तुम्हारी माँ ने कुछ सिखाया
नहीं है क्या ?

और तुम्हारा बाप,
तुम्हारा बाप बाकी बचा हुआ
दहेज कब देगा?

आख़िर इस सब में
मेरी क्या गलती है बताओं

अंगारों पर चलकर खुद की
इज़्ज़त बचाने की कोशिश की
थी तब ये सब लोग कहाँ थे?

जब मैं चीखीं थी
प्लीज़ मुझें कोई बचाओ....

अगर यही सब होना है
तो बंद करो ये ढोंग
"बेटी बचाओं , बेटी पढ़ाओं
.."
और एक बार...
बस एक बार कह कर देखो
बेटी जाओं...दौड़ों...अरे गिर
गई ... संभालों खुद को ... उठों
दौड़ों...
जाओं बेटी जाओं
अपने हिसाब से अपनी जिंदगी
बिताओं

जब एक नारी कुछ करने की
ठान ले
तो उसे कोई नहीं रोक पाता है
हक़ीक़त जानो दुनियां वालों
जब एक नारी बदलती है
तो इतिहास फिर से लिखा
जाता है.



**मानसी राजेश काळे**
बी.एस्सी. प्रथम वर्ष
बद्रीनारायण बारवाले
महाविद्यालय, जालना

# एका विधवा रणरागिणी आईचे संघर्षमय जीवन

(महिला दिन विशेष)

जीवनाच्या वाटेवर अचानक
वादळ काळोख घेऊन आले,
साथीदार निघून गेला
आणि स्वप्नांचे घरच कोसळून गेले...

हातात उरली फक्त जबाबदारी,
डोळ्यांत वेदनांचा सागर,
तरीही अश्रू पुसून उभी राहिली
ती धैर्याची एकल आई प्रखर.

दिवसभर कष्टांचा डोंगर,
रात्री काळजी मुलांच्या भवितव्याची,
भूक, थकवा, दुःख विसरून
लढाई तिची उद्याच्या आशेची.

शाळेची फी, वह्या-पुस्तकं,
गणवेश आणि स्वप्नांची ओझी,
गरीबीच्या सावलीतही
आईच्या मायेने मुलं वाढी.

कधी योजना आधार देतात,
कधी शिष्यवृत्ती आशा दाखवते,
पण प्रत्येक पावलावर संघर्षाची
नवी परीक्षा उभी राहते.

समाजाच्या कठोर नजरा
मनाला जखमा देऊन जातात,
तरीही तिच्या डोळ्यांत स्वप्न
मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी
जळतात.

ती फक्त एकल महिला नाही,
ती धैर्य, त्याग आणि मायेची कहाणी,
तिच्या संघर्षातूनच उजळते
नव्या समाजाची पहाट सुहानी.

महिला दिनाच्या या क्षणी
एकच प्रण करू या सारे,
प्रत्येक एकल आईच्या संघर्षाला
सन्मान आणि आधार देऊ या खरे



**कवयत्री : स्वाती संदीप यादव,
एकल महिला - रा. तळेगाव,
ता. अंबाजोगाई, जि.बीड**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


# माय माती

ती उठायची
भल्या पहाटे
सूर्य उगण्याआधी..

बसायची जात्यापाशी
भरडलेल्या आयुष्याला घेऊन
दळण्यास दळण
चिमण्या पाखरांच्या
इतभर पोटाला
भाकर मिळावी म्हणून..

आणायची ओढून
आडातून पाणी
दोन दोन रांजण
अन् करून
चुलीवर भाकरी
निघायची वावरात
अन् लढायची उन्हाशी
हिरव्या पिकाच्या स्वप्नासाठी..

ती राबली
आयुष्यभर
बापासंगे मातीत
उभ्या जन्माची माती होईपर्यंत..

अन् गेली शेवटी मातीत
मातीला ठेवून मागं
आमची उपासमार
होऊ नये म्हणून..

अजून ही
ओलीच आहे माती
तिच्या घामाच्या पावसाने..

म्हणून शोधतोय मी
त्या शिवारातल्या
ओल्या मायाळू मातीत
माय माझी..

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०९ मार्च २०२६


# भारतीय स्त्री कालची, उद्याची, आजची

सन १९०८ मध्ये सुमारे १५००० महिलांनी न्यूयॉर्क येथे मोर्चा काढला त्यात त्यांनी अनेक मागण्या केल्या जसे की महिलांसाठी कामाचे तास कमी केले जावे वेतन वाढ करावी तसेच महिलांना मताचा अधिकार द्यावा. आपल्या भारतीय संविधानात मात्र महिलांना मताधिकार असून प्रत्येक मताचे मूल्य हे समान आहे इसवी सन १९१० मध्ये कोपेन हेग येथे Working Women Conference घेण्यात आली. यात १७ देशांच्या प्रतिनिधी महिला उपस्थित होत्या, त्यामध्ये उपस्थित असलेल्या Clara Zetkin यांनी सुचवले की वर्षातील एक दिवस आपण आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा करावा या प्रस्तावाला एक मुखाने मान्यता देण्यात आली आणि तो प्रस्ताव स्वीकारला गेला. परंतु त्याची खरी अंमलबजावणी मात्र सुरू झाली ती १९७५ यावर्षी युनोने ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करावा अशी मान्यता देण्यात आली तसेच १९७५ हे वर्ष International Women Year म्हणून घोषित करण्यात आले.भारतीय स्त्रीचा आदर्श :-माता या नावासारखे मधुर अन्य कोणी नाही आणि म्हणूनच सांप्रदायिक लोक सर्वव्यापी या जगतशक्तीला माऊली माता याच भावाने तिची पूजा करतात तिला मान सन्मान देतात स्त्री जीवनाचा सर्वोच्च आदर्श म्हणजे माता असे भारतात मानले जाते.जननी हे शक्तीचे पहिले विकसित रूप आहे जनकापेक्षा जननीला भारतात श्रेष्ठ मानतात शक्तिमत्ता सर्व शक्ती संपन्नता ईश्वरी शक्तींची भावना वगैरे अशा गोष्टी माता या शब्दात समाविष्ट आहेत आपली आई म्हणजेच सर्व शक्तिमान व्यक्ती अशी बालकाची भावना असते.मातृत्व हेच भारतीयांच्या दृष्टीने स्त्री तत्त्वाचा सर्वोच्च आविष्कार आहे जिच्या ठिकाणी स्वार्थाचा लेश देखील नाही जी मूर्तिमंत सहनशील असते आणि क्षमा वृत्तीची ती एक केवळ मूर्तीच असते अशी ती आई ती आम्हा सर्वांचाच आदर्श. भारतीय स्त्रीचे भवितव्य :- स्त्री पूजनाने सारे समाज थोर पदवीला पोहोचले आहे ज्या देशात ज्या समाजात स्त्री पूजन नाही तो देश तो समाज कधीही मोठा होऊ शकला नाही व पुढे कधी काळही होणे शक्य नाही तुमच्या साऱ्या समाजाला जो हा अध पात झाला आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे शक्तीरुपीनी स्त्रियांची झालेली अवहेलना हेच होय.स्त्री आणि शिक्षण :-खरे शिक्षण म्हणजे नुसते शब्द घोकणे नव्हे तर सर्व मानसिक शक्तीचा विकास करणे हेच खरे शिक्षण होय शिक्षण म्हणजे व्यक्तींना अशा रीतीने वळण लावणे की जेणेकरून त्या आपली इच्छाशक्ती चांगल्या गोष्टीकडे वळू शकतील आणि ती गोष्ट प्रत्यक्ष कृतीत आणू शकतील थोर निर्भय स्त्रियांची जी भारतात वाण आहे ती अशा शिक्षणाने दूर होईल आणि संघमित्रा, लीला, अहिल्याबाई मीराबाई राजमाता जिजाऊ यांची परंपरा पुढे चाले भगवंताच्या चरणस्पर्शाने प्राप्त होणारे सामर्थ ज्यांच्या हृदयात विराजमान आहे ज्या पवित्र आणि निस्वार्थ आहेत आणि म्हणूनच वीरमाता होण्यास ज्या पात्र आहे अशा स्त्रिया शिक्षणाने निर्माण होतील.




**प्रा. स्वाती उगले**
**(सहशिक्षिका)**
भौतिकशास्त्र विभाग
देवगिरी महाविद्यालय,
छ. संभाजीनगर ९९२२८५१६३८


## नव चैतन्याची खाण

विश्व स्त्रियांचे सुंदर,
जगतांना अनमोल.
सदा सर्वदा साधते,
नात्यामध्ये समतोल.

आहे स्त्रीला वरदान,
नव चैतन्याची खाण.
पचविते संसारात,
साऱ्या कुटुंबाची ताण.

तिच्या हाती संसाराची,
सहनशक्तीची दोरी.
होऊ देत नाही कधी,
कुटुंबात शिरजोरी.

कुटुंबाचे संरक्षण,
सदा सर्वदा करते.
आनंदाने संसारात,
सप्तरंग ती भरते.

स्त्रीचे विश्व आहे सदा,
सुख-दु:खाने पेरले.
माया ममता प्रेमाने,
विश्व तिचे हो भरले.

दोन्ही घरात प्रेमाने,
नाते ठेवते टिकून.
आई बापाच्या घरून,
येते संस्कार शिकून.




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


## बाल हक्कांसाठी ग्रामपंचायतींना विशेष प्रशिक्षण



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग (MSCPCR), यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) आणि UNICEF यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे ग्रामपंचायतींसाठी बाल हक्कांवरील दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ५ आणि ६ मार्च रोजी प्रथम अरोरा सेंटर फॉर एज्युकेशन (PACE) येथे ही कार्यशाळा पार पडली.

या कार्यशाळेत छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर आणि नाशिक या चार विभागांतील २० जिल्ह्यांमधील ५० ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामविकास अधिकारी असे सुमारे ९७ प्रतिनिधी सहभागी झाले होते. ग्रामपंचायत विकास आराखड्यासारख्या स्थानिक नियोजन प्रक्रियेत मुलांचा सहभाग वाढवणे आणि त्यांच्या समस्यांचा समावेश करण्यासाठी ग्रामपंचायत प्रतिनिधींना प्रोत्साहन देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कार्यशाळेतील सत्रांचे मार्गदर्शन यशदा येथील प्राध्यापक डॉ. राम पोले, UNICEF च्या सामाजिक धोरण तज्ज्ञ डॉ. देविका देशमुख, MSCPCR च्या प्रशासकीय अधिकारी वंदना जैन आणि CMCA, बेंगळुरूच्या डॉ. प्रिया नाम्बियार यांनी केले. गावातील निर्णय प्रक्रियेत मुलांचा आवाज प्रभावीपणे पोहोचावा यासाठी बाल पंचायत आणि बाल सभांच्या संकल्पनेचा प्रभावी वापर कसा करावा, यावर कार्यशाळेत विशेष भर देण्यात आला. MSCPCR चे माजी सदस्य ॲड. संजय सेंगर यांनी बाल संरक्षण प्रणाली आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका स्पष्ट केली, तसेच CMCA ने बाल सभा राबविण्याचे अनुभव सादर केले.

कार्यशाळेदरम्यान सहभागी प्रतिनिधींनी त्यांच्या ग्रामपंचायतींमधील अनुभव मांडले. नांदेड जिल्ह्यातील येरगी गावाच्या सरपंचांनी सांगितले की, त्यांच्या गावात बाल पंचायत सुरू केल्यानंतर परिसरातील इतर गावांनाही ही संकल्पना राबवण्याची प्रेरणा मिळाली असून बाल सहभागाला अधिक चालना मिळाली आहे.

ही कार्यशाळा महाराष्ट्रातील व्यापक बाल सहभाग उपक्रमाचा एक भाग आहे. यशदाकडून निवडलेल्या मास्टर ट्रेनर्सच्या माध्यमातून विविध जिल्ह्यांमध्ये बाल हक्क मॉड्यूल राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे स्थानिक प्रशासन अधिक बाल-प्रतिसादक बनवणे आणि बाल हक्कांबाबत सामुदायिक मालकी मजबूत करणे हा उद्देश आहे.

या प्रशिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथील सरपंच योगेश कोठुळे, सविता निकुंभ, संजय गरड आणि जयश्री दिवेकर यांची उपस्थिती होती. तसेच राज वानखेडे (NIRDPR), जॉर्ज क्रिस्टो (युनिसेफ), सत्र समन्वयक सतीश वानखेडे, वैष्णवी अय्यर (युनिसेफ) आणि मधुकर मोरे यांनी कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## वसुंधरेचे ऋण फेडू

हिरव्यागार झाडावर
करू नका वार
उन्हाळ्यात आपणास
सावली देते गार

पाणी म्हणजे जीवन
असू द्या ध्यानी
पाण्याचा दुरुपयोग
करू नका कुणी

कचरा टाकण्यासाठी
वापरा कचरा पेटी
प्रदूषण वाढले की
होईल दमदाटी

पशुपक्षी आपले सोबती
करा त्यावरी दया
आपल्यावरही करतील ते
जीवापाड माया

पाळा निसर्गाचे नियम
मानव कल्याणासाठी
अन्यथा संकटरूपी राक्षस
धावून येईल पाठी

बहरलेल्या वृक्षवेलीला
नका कुणी छेडू
निसर्गाचे संवर्धन करुनी
वसुंधरेचे ऋण फेडू




**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106


## चढणीचा घाट

चढणीचा घाट! नागमोडी वाट!
डोंगराचा काठ! शिणलेला!!

उन्हाचा कहर! शिणलं शिवार!
कोरड वावर! आयुष्याचं!!

घामाच्या पुरात! बुडालाय जीव!
सोडलीय शिव! भाकरीने!!

कर्जाचा डोंगर! व्याजाचा
विळखा!
फुकाचा पुळका! वाढलेला!!

फाटलेली झोळी! डोईवर मोळी!
काळरात्र भाळी! लिहिलेली!!

तरी उजेडाची! घेऊनिया आस!
भुईचा हा दास! लढतोय!!


**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**